# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६०१२६४
२५६०१२६५
ई—मेल: pldvp@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग

संदर्भ : साफुपुवि/निववि/1159 दिनांक : /१२/२०१७

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संबंधित संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

**विषय : महाविद्यालय गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत बिगर आदिवासी व आदिवासी विभागातील संलग्न महाविद्यालय/मान्यताप्राप्त संस्थाना शैक्षणिक वर्ष सन २०१७—१८ मध्ये सौर ऊर्जा उपकरणे अर्थसहाय्य मंजूरीबाबत.**

महोदय/महोदया,

महाविद्यालय गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत बिगर आदिवासी व आदिवासी विभागातील संलग्न महाविद्यालय/मान्यताप्राप्त संस्था यांनी शैक्षणिक वर्ष सन २०१७—१८ मध्ये ऑनलाईन पध्दतीने सौर ऊर्जा उपकरणासाठी मार्गदर्शकतत्वांस अनुसरून प्रस्ताव सादर केलेले आहेत. अशा महाविद्यालयांना/संस्थांना त्यांच्या नावापुढे नमूद केलेल्या रकमेस सोबत जोडत असलेल्या मार्गदर्शकतत्वांस अनुसरून विद्यापीठ नियमाच्या अधिन राहून सोबत जोडलेल्या तक्त्यात नमूद केल्यानुसार त्रुटींची पूर्तता करण्याच्या अटीवर अर्थसहाय्य साफुपुवि/निववि/१००८ दिनांक २५/११/२०१७ च्या परीपत्रकास अनुसरून मंजूरी देण्यात आलेली होती.

सदरील मंजूरी पत्रामध्ये त्रुटींची पुर्तता करण्याच्या अटीमध्ये नॅक/एन.बी.ए. सर्टीफीकेट सादर करण्याच्या अटीवर मान्यता देण्यात येत आहे. असे कळविण्यात आले होते. या परीपत्रकान्वये नॅक व एन.बी.ए. सर्टीफीकेट सादर करण्याची अट रद्द करण्यात येत आहे. सदरील अट गुणवत्ता सुधार योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार दोन राज्यस्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यासाठी लागू राहील, याची कृपया सर्वांनी नोंद घेवून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करावी.

कळावे,

उपकुलसचिव
नियोजन व विकास